दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 82 ■ गुरुवार दि. 23 ऑक्टोबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006






## मानवतेचा दीप लावू!

आपण वर्षभर विविध सण साजरे करतो, त्यात दिवाळी सणाला विशेष महत्व आहे कारण दिवाळी हा असा एकमेव सण आहे जो आपण पाच दिवस साजरा करतो. आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगात दिवाळी उत्साहात साजरी केली जाते म्हणूनच दिवाळीला सणांचा राजा म्हणतात. दिवाळी सारखा उत्साह इतर कोणत्याच सणात नसतो. दिवाळीत लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांच्याच उत्साहाला उधाण येते म्हणूनच गरीब असो वा श्रीमंत, राज महालात राहणारा राजा असो की झोपडीत राहणारा गोरगरीब प्रत्येक जण दिवाळी सण साजरा करतो. लहान मुलांसाठी तर दिवाळी म्हणजे पर्वणीच असते. शाळेला सुट्टी, नवे कपडे, नव्या वस्तू, किल्ला बनवणे, फटाके उडवणे, मिठाई, फराळ, मामाच्या गावाला जाणे अशा सर्व आवडत्या गोष्टी फक्त दिवाळीत करता येतात. दिवाळी म्हणजे लहान मुलांची चंगळ. केवळ लहान मुलेच नाही तर भावा - बहिणींचा देखील हा आवडता सण कारण दिवाळीतच भाऊबीज हा बहीण - भावांचा आवडता सण येतो. सासरी असलेली बहीण भावाला ओवाळण्यासाठी दिवाळीत आवर्जून माहेरी येते. दिवाळी हा आबालवृद्धांचा आवडता सण.

दिवाळी सण म्हणजे प्रकाशाचा सण, दिव्यांचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या काळात आकाशकंदील, पणत्या, रांगोळी, नवी खरेदी, नव्या वस्तू, नवे कपडे, फटाके यांची रेलचेल. आताही या वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. २०२० आणि २०२१ या दोन वर्षात कोरोनाने जगभर धुमाकूळ घातला होता त्यामुळे या दोन वर्षात लोकांना मनासारखी दिवाळी साजरी करता आली नव्हती. मागील दोन वर्षापासून दिवाळीवरील कोरोनाचे सावट नाहीसे झाले मात्र कोरोनामुळे अनेकांचा रोजगार हिरावला गेला त्यामुळे अनेकांनी साधेपणाने दिवाळी साजरी केली. मागील दोन वर्षापासून दिवाळीवर कशाचेही सावट नसल्याने लोकांना दिवाळी मनासारखी साजरी केली. महागाई वाढली असली तरी दिवाळीचा उत्साह कमी झाला नाही उलट वाढतच गेला. दिवाळी हा आनंदाचा, उत्साहाचा आणि प्रसन्नतेचा उत्सव असल्याने हा उत्साह यावर्षीही असाच कायम राहील असे वाटत होते मात्र ऐन दिवाळीच्या आधी झालेल्या अतिवृष्टीने या उत्साहावर पाणी पडले. राज्यातील शेतकऱ्यांवर आसमानी संकट आले. राज्यातील विविध भागात झालेल्या अतिवृष्टीने उभी पिके आडवी झाली. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी हवालदिल झाला. या संकटातून सावरण्याची ताकद शेतकऱ्यांना मिळो आणि त्यांची दिवाळी गोड व्हावी अशी प्रार्थना राज्यातील 13 कोटी जनता देवाजवळ करत आहे.

दिवाळी म्हणजे आनंदाचा दीपोत्सव.....!

बाहेर प्रकाशाचे दिवे पेटवायचे आणि हृदयातून ज्ञानाचे दिवे प्रज्वलित करायचे. अंतःकरणात अज्ञानाचा, विषमतेचा, अहंकाराचा अंधार असेल तर तो दूर करायच. ज्या प्रमाणे आकाशकंदील, पणत्या लावून बाहेरील अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते तसेच आपल्या अंतःकरणात असलेल्या अवगुणांचा अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते. प्रत्येक मनुष्याने शुभ चिंतन करून, शुभ विचार मनात आणून, शुभ विचार प्रकट करून जीवन प्रगल्भ आणि समृद्ध करावे हाच संदेश दिवाळी देते.

जीवनातून आसुरी शक्तीचा पराभव करण्यासाठी दैवी शक्तीचा वापर करावा. मानवाची सर्व धडपड जीवनात सुख आणि आनंद मिळवण्यासाठीच चाललेली असते. दुःख भोगल्याशिवाय सुखाची किंमत कळत नाही हे तत्वज्ञान सांगण्यासाठी ठीक; मात्र दुःखाची अनुभूती घेण्यास कोणालाही आवडत नाही. मनुष्य स्वभावातील हा स्थायीभाव ओळखूनच भारतीय संस्कृतीत सणांची निर्मिती केलेली असावी याचे भान ठेवूनच प्रत्येकाने सण साजरे करावेत.

गरीब, कष्टी, दीन, दुबळे, वंचित असा मोठा दुःखी वर्ग समाजात आहे. आपल्या घरी दिवाळी साजरी करताना त्यांच्याही घरी आनंदाचा एक दिवा लावावा म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावर देखील आनंदाची रेषा पसरेल. या दुःखी, कष्टी लोकांच्या चेहऱ्यावर हास्य पसरवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्यच आहे. साने गुरुजी म्हणतात त्याप्रमाणे बाहेर अनंत दिवे पाजळून दिवाळी येत नसते. हृदयात प्रेमाच्या, मानवतेच्या पणत्या लावून आनंदाची उधळण करणाऱ्या या सणातून आपल्या जीवनात प्रकाश आणू या! अशी दिवाळी साजरी झाली तरच खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली असे म्हणता येईल अन्यथा नाही!

# दिवाळीच्या मुहूर्तावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा अण्णा हजारे यांच्याशी संवाद — राळेगणसिद्धीला भेट देण्याचे आश्वासन





मुंबई - दिवाळीच्या शुभमुहूर्तावर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांच्याशी व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधला. या संवादादरम्यान उपमुख्यमंत्री शिंदे यांनी अण्णा हजारे यांना दिवाळी आणि नववर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

या मैत्रीपूर्ण संवादात अण्णा हजारे यांनी राळेगणसिद्धी गावातील विविध उपक्रमांची माहिती उपमुख्यमंत्री शिंदे यांना दिली तसेच त्यांनी लवकरच राळेगणसिद्धीला भेट देण्याची विनंतीही केली. अण्णांच्या सोबत गावातील ग्रामस्थांनीही उपमुख्यमंत्री यांना एकदा तरी राळेगणसिद्धीला प्रत्यक्ष भेट देण्याचे आवाहन केले.

गावकऱ्यांच्या या आग्रहाला सकारात्मक प्रतिसाद देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लवकरच राळेगणसिद्धीला भेट देण्याचे आश्वासन दिले. शिंदे यांनी सांगितले की, "अण्णांनी निर्माण केलेले राळेगणसिद्धी हे आदर्श ग्रामविकासाचे प्रेरणास्थान आहे. अशा कार्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी नक्की घेईन."

दिवाळीच्या या संवादातून अण्णा हजारे आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यातील आत्मीयता आणि समाजसेवेबाबतचा परस्पर सन्मान स्पष्ट दिसून आला. लवकरच होणाऱ्या या भेटीमुळे राज्यातील ग्रामविकास आणि लोकसहभागी उपक्रमांना नवचैतन्य मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ओबीसी क्रांती मोर्चाच्या वतीने बळीराजा दिन उत्साहात साजरा

भंडारा – "इडा पिडा टळो, बळीचं राज्य येवो" या मंगल शुभेच्छा देत ओबीसी क्रांती मोर्चाच्या वतीने भंडारा जिल्ह्यातील पिंपरी येथे बळीराजा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शेतकरी आणि ग्रामीण समाजजीवनातील बळीराजाचे महत्व अधोरेखित करत या कार्यक्रमात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर, सध्याच्या शेतीस्थितीवर आणि ओबीसी समाजाच्या हक्कांबाबत चर्चा झाली.



राजा बळी हा पराक्रमी, दानशूर आणि न्यायप्रिय शासक मानला जातो. त्याच्या राज्यात प्रजेला सुख, समाधान आणि समृद्धी लाभली होती, अशी लोकपरंपरा आहे. त्याच स्मरणार्थ आणि त्या न्यायपूर्ण राज्यकारभाराच्या आदर्शापासून प्रेरणा घेण्यासाठी हा दिवस दरवर्षी बळीराजा दिन म्हणून साजरा केला जातो.

कार्यक्रमात ओबीसी क्रांती मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष संजय मते यांनी सांगितले की, "बळीराजा म्हणजे शेतकरी. त्याच्या श्रमावर संपूर्ण देश उभा आहे. पण आज तोच शेतकरी संकटात आहे. बळीराजाच्या राज्यातील समानता आणि न्याय आजच्या समाजव्यवस्थेत रुजवणे हीच खरी दिवाळी ठरेल."



तर शेतकरी भाऊ कातोरे यांनी आपल्या भाषणात म्हटले की, "शेतकऱ्यांना योग्य दर, सिंचनाची सुविधा आणि शेतीला लागणाऱ्या घटकांचा योग्य पुरवठा झाला तरच खरी समृद्धी येईल. बळीराजाचा आदर्श ठेवून सरकारने शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घ्यावेत."

या कार्यक्रमात शेतकऱ्यांनी पारंपरिक वेशभूषेत सहभाग घेतला. बळीराजाच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून शेतकरी सन्मान सोहळा पार पडला. शेवटी सर्वांनी "इडा पिडा टळो, बळीचं राज्य येवो" असा जयघोष करीत कार्यक्रमाची सांगता केली.

# दिवाळीच्या रात्री अकोल्यात भीषण अपघात:कार थांबवून खाली उतरलेल्या पती-पत्नीसह तिघांचा जागीच मृत्यू

अकोला- दिवाळीच्या रात्री अकोला जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गावर एका भीषण अपघाताची दुःखद घटना घडली आहे. अकोला जिल्ह्यातील काटेपूर्णा ते पैलपाडा गावादरम्यान एका अज्ञात वाहनाने चारचाकी वाहनाच्या बाजूला उभ्या असलेल्या तीन जणांना चिरडले. या अपघातात पती-पत्नीसह तीन जण जागीच ठार झाले असून, एक जण गंभीर जखमी झाला आहे. या घटनेमुळे बोरगाव मंजू गावावर दिवाळीच्या दिवशी शोककळा पसरली आहे. बोरगाव मंजू येथील धीरज सिरसाट आणि अश्विनी सिरसाट हे दांपत्य खेर्डी येथील आपला व्यवसाय आटोपून एका प्रवासी कारने बोरगावमंजूकडे घरी निघाले होते. मात्र, रस्त्यात त्यांची कार बिघडल्यामुळे एका मालवाहू वाहनाद्वारे गाडी टो करून नेत होते. यावेळी हे चौघेही कारच्या खाली उतरलेले होते. अमरावतीकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या एका अज्ञात वाहनाने खाली उतरलेल्या या चारही जणांना जोरदार धडक दिली.



तिघांचा जागीच मृत्यू

या भीषण धडकेत दोन पुरुष आणि एका महिलेचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. मृतांमध्ये धीरज सिरसाट, अश्विनी सिरसाट (पती-पत्नी) आणि आरिफ खान (चालक) यांचा समावेश आहे. हे तिघेही बोरगावमंजूचे रहिवासी होते. कारचा वाहक मात्र गंभीर जखमी झाला असून, त्याला तातडीने अकोला जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अकोला पोलीस धडक देऊन पळून गेलेल्या अज्ञात वाहनाचा शोध घेत आहेत. ऐन दिवाळीच्या सणासुदीच्या काळात झालेल्या या अपघातामुळे बोरगावमंजू आणि परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

लोणीकंदमध्ये कंटेनर-ट्रॅक्टर अपघातात दुचाकीस्वार ठार

दुसरीकडे पुणे जिल्ह्यातील लोणीकंद परिसरात एका भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला आहे. फुलगाव ते आळंदी रस्त्यावर भरधाव कंटेनरने धडक दिल्याने दुचाकीस्वार रस्त्यावर पडले आणि त्यानंतर पाठीमागून येणाऱ्या ट्रॅक्टरखाली सापडून त्यांचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी कंटेनर आणि ट्रॅक्टर चालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत्यू झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव राजेंद्र चंद्रकांत चव्हाण (वय 53, रा. चव्हाणनगर, देहूगाव, ता. हवेली) असे आहे. त्यांचे भाऊ संजय चव्हाण (वय 51) यांनी लोणीकंद पोलीस ठाण्यात यासंदर्भात फिर्याद दिली आहे.

# नागपुरात लक्ष्मीपूजनाला फटाक्यांमुळे 7 ठिकाणी आग

## रिलायन्स मॉलसह कोट्यवधींचे नुकसान, 3 तासांनी विझविली आग

नागपुरात लक्ष्मीपूजनाच्या दिवशी अग्नि तांडव झाल्याचा अनुभव आला. फटाक्यांमुळे शहरात सात ठिकाणी आगी लागल्या. यात लक्ष्मी नगर स्थित रिलायन्स मॉल भस्मसात झाला. मॉलमधील वाण सामानासह इतरही सामान जळुन खाक झाल्याने कोट्यवधीचे नुकसान झाल्याची माहिती आहे. तीन तासाच्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. स्थानिक रहिवासी फटाके फोडत असताना एक फटाका मॉलच्या आतमध्ये जाऊन पडल्याने आग लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दिवाळीनिमित्त हा मॉल सायंकाळी लवकर बंद करण्यात आला. शहरात लक्ष्मीपूजनाच्या दिवशी आग लागल्याचे एकूण 17 कॉल आले. त्यातील 7 आगी फटाक्यांमुळे लागल्याची माहिती मनपाने दिली आहे. आठ रस्ता चौकातली मॉलला मंगळवारी





रात्री 9 वाजताच्या सुमारास आग लागली. लोक जात येत असताना अचानक इमारतीत आगीने पेट घेतला. काहींनी फायर ब्रिगेडला फोन केला. पण ते येईपर्यंन्त चौथ्या मजल्यापर्यंत आग पोहोचली होती. सगळी इमारत धडधडून पेटलेली होती, असे प्रत्यक्षदर्शीने सांगितले. अगोदर खाली दुकानापाशी मोठी आग लागलेली दिसली. काहींनी फायरब्रीगेडला फोन लावला.

पण ते येई पर्यंत डोळ्यांसमोर काही सेकंदात उभी इमारत आगीच्या भक्ष्यस्थानी जातांना बघितली असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. सुरूवातीला दोन मजले पेटले होते. नंतर पाहाता पाहाता चौथा, पाचव्या मजल्यांनी पेट घेतला. इमारतीच्या आतूनही जाळ निघायला लागला होता.या शिवाय शहरात गणेशपेठ परिसरातील बाजार समिती कार्यालय, गणेश पेठ पोलिस ठाण्यासमोर एक कार, ओंकार नगर ते बेसा रोड नाल्या समोरील एक नर्सरी, जरी पटक्यात कचऱ्याचा ढीग, अयोध्या नगर, राम मंदिर रोड येथील डॉ. बोनरा यांचे घर, तथागत चौकातील झोपड्यांमध्ये, जरीपटका चौक येथे रॉकेटमुळे एका झाडाला दक्षिणा मूर्ती चौक, महाल येथील एका घरात आग लागल्याची माहिती विविध नागरिकांनी दिली. माहिती मिळताच अग्निशमन दलाने गाड्या पाठवून आगी नियंत्रणात आणल्या.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित



## दीपावली लक्ष्मीपूजनानिमित्त लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे स्मारकाचे पूजन

**आपला विदर्भ लाईव्ह**
**महारचिकना प्रतिनिधी**

लोणार तालुक्यातील खळेगाव येथे लोकनेता प्रतिष्ठान, खळेगाव यांच्या वतीने विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येतात. यामध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, सामाजिक उपक्रमांचे आयोजन आदी उपक्रमांचा समावेश आहे. याच उपक्रमांच्या अनुक्रमे, दिनांक 12 डिसेंबर 2024 रोजी खळेगाव येथे लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या स्मारकाची स्थापना करण्यात आली होती. याच स्मारकाचे पूजन दिनांक 21 ऑक्टोबर 2025, दीपावली लक्ष्मीपूजनाच्या पवित्र दिवशी, समस्त खळेगाव ग्रामस्थांतर्फे मोठ्या श्रद्धा व उत्साहाने करण्यात आले. या पूजन सोहळ्याला गावातील सर्व जाती-धर्मातील नागरिक उपस्थित होते. या प्रसंगी गावात ऐक्य, सद्भावना आणि लोकनेते मुंडे साहेबांच्या कार्याचे स्मरण यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला.

### मेहकर नगर परिषद निवडणूक

# चुरशीची लढत, दिग्गज आमने-सामने.?

मेहकर. जिल्ह्यातील राजकारणाचा नेहमीच केंद्रबिंदू ठरलेला मेहकर नगर परिषद पुन्हा एकदा चर्चेच्या हिवाळ्यात आला आहे. या वेळी निवडणुकीचे वातावरण अगदीच तापलेले आहे. कारण या वेळी आरक्षण खुल्या प्रवर्गासाठी सुटल्याने अनेक राजकीय दिग्गज पुन्हा मैदानात उतरतात, अशी जोरदार चर्चा रंगली आहे.

मागील अनेक वर्षांपासून मेहकरमधील सत्ता एका पक्षाच्या ताब्यात होती. त्यामुळे स्थानिक राजकारणात नव्या प्रयोगांची अपेक्षा फार कमी होती. मात्र, यावेळी परिस्थिती काहीशी बदलली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार सिद्धार्थ खरात यांचे नेतृत्त्व स्थानिक राजकारणात नवा वारा घेऊन आले आहे.



आमदार खरात यांच्या विश्वासू आणि कार्यतत्पर कार्यकर्ते किशोर भास्कर गारोळे यांचे नाव आघाडीवर आहे. किशोर गारोळे हे यंदाच्या निवडणुकीत पक्षाचे प्रमुख उमेदवार मानले जात आहेत, आणि त्यांची उमेदवारी निवडणूक ही एक दिग्गज-स्तरीय चुरशीची लढत ठरणार आहे, अशी चर्चा आहे. दुसऱ्या बाजूला, विरोधी पक्षही आपल्या ताकदीचे दिग्गज उमेदवार रिंगणात उतरवण्यासाठी तयारी करत आहेत. त्यामुळे, मेहकर नगर परिषद निवडणूक ही फक्त स्थानिक सत्ता मिळवण्याची लढत नाही, तर राजकीय अस्तित्व सिद्ध करण्याची लढत ठरणार आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, या निवडणुकीत खालील मुद्दे विशेष महत्त्वाचे ठरणार आहेत:

आमदार सिद्धार्थ खरात कोणती राजकीय रणनीती आखतात?

किशोर गारोळे यांना कोणत्या दिग्गज उमेदवाराशी सामना करावा लागणार?

नगर परिषद निवडणुकीत नव्या समीकरणांमुळे स्थानिक राजकारणात कसा बदल होईल?

मेहकर नगर परिषद निवडणुकीत यंदा सत्ता आणि प्रतिष्ठेची ताटातूट होईल की, राजकीय नकाशा बदलेल, हे पाहणे खूप मनोरंजक ठरणार आहे. राजकीय वातावरण तणावपूर्ण असले तरी, निवडणुकीची ही लढत स्थानिक जनता आणि राजकीय वर्तुळासाठी एक मोठी परीक्षा ठरणार आहे.



**देविदास खनपटे**
मुख्य संपादक

## म्हशींच्या सौंदर्य आणि पळवण्याच्या स्पर्धा यंदाही रंगल्या

कोल्हापूर – दिवाळीच्या पाडव्याच्या निमित्ताने कोल्हापूरमध्ये म्हशी पळवण्याच्या आणि म्हशी सजवण्याच्या स्पर्धा यंदाही उत्साहात पार पडल्या. दरवर्षीप्रमाणे कसबा बावड्यातील मार्केट परिसरात सकाळपासूनच म्हैस मालकांनी आपल्या म्हशींसह गर्दी केली होती.

मागील १५ वर्षांपासून भारतवीर मित्र मंडळ या पारंपरिक सोहळ्याचे आयोजन करत आहे. यंदाही जवळपासच्या परिसरातील म्हशी मालक आपल्या लाडक्या म्हशीला सजवून मिरवण्यासाठी आले होते. हलगीचा कडकडाट, शिंगांना सुंदर मोरपीस, पायांवर घुंगऱ्यांचा चाळ, चांदी-सोन्याचे तोडे आणि गळ्यात कवड्यांची माळ या सजावटीमुळे वातावरण रंगून गेले होते.

सौंदर्य स्पर्धेच्या प्रत्येक क्षणाला प्रेक्षकांनी उत्साहात आनंद साजरा केला. त्याचसोबत, म्हशी पळवण्याच्या स्पर्धेतही सहभागी मालकांचा उत्साह आणि प्रेक्षकांचा आनंद पाहण्यासारखा होता. या कार्यक्रमाला काँग्रेस आमदार पाटील यांनीही हजेरी लावली आणि गाडीमागे म्हशी पळवण्याचा अनुभव घेतला.

ल्या अनेक वर्षांची ही पारंपरिक सोहळा आजही कोल्हापूरकरांच्या जीवनाचा भाग असून, स्थानिक संस्कृतीतला एक रंगीत क्षण म्हणून दरवर्षी जपला जातो.



## "शेतकरी समृद्ध झाला, तरच खरी दिवाळी उजळेल," — नाना पटोले

भंडारा -काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी यंदा त्यांच्या सुकळी गावात दिवाळीचा उत्सव अगदी साध्या आणि कौटुंबिक वातावरणात साजरा केला. यावर्षी महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर





नाना पटोले यांनी फटाके, धामधूम टाळून शेतकरी बांधवांच्या दु:खात सहभागी होत दिवाळी साजरी केली.


यावेळी लक्ष्मीपूजन करून त्यांनी "बळीराजाला आर्थिक संपन्नता मिळो, आणि त्याच्या कष्टाचे दिवस संपो," अशी मनापासून प्रार्थना केली. साधेपणातून दिलेला हा संवेदनशील संदेश सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरला आहे.

## अंबाबाई देवीची लक्ष्मीस्वरूपात विशेष पूजा; भक्तांची मोठी गर्दी

कोल्हापूर - दिवाळीच्या लक्ष्मीपूजन दिनानिमित्त करवीरनिवासिनी श्री अंबाबाई देवीच्या मंदिरात आज देवीची लक्ष्मीस्वरूपात विशेष पूजा मोठ्या भक्तिभावाने पार पडली. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भक्तांची मोठी गर्दी उसळली होती. देवीच्या दर्शनासाठी भाविकांनी लांबच लांब रांगा लावल्या होत्या.

फुलांनी, दिव्यांनी आणि आकर्षक सजावटीने नटलेल्या श्री अंबाबाई मंदिरात आजच्या शुभदिनी वातावरण अत्यंत भक्तिमय झाले होते. देवीची ही पूजा मंदिराचे हक्कदार श्रीपूजकांच्या उपस्थितीत वेदघोष आणि मंत्रोच्चारात पार पडली. या पूजेच्या निमित्ताने देवीला सुवर्ण आणि रौप्य अलंकारांनी सजवण्यात आले. देवीच्या पादुका, सिंहासन आणि मंदिरातील मंडप विविध फुलांनी सजवण्यात आले होते. लक्ष्मीपूजनाच्या या मंगलदिनी देवीच्या दर्शनाने घरात धन, धान्य आणि समृद्धी लाभते, अशी श्रद्धा असल्याने कोल्हापुरासह राज्यभरातून भाविकांनी अंबाबाईच्या दर्शनासाठी येण्यास सुरुवात केली होती. सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांची गर्दी वाढत गेली.

संध्याकाळी दीपप्रज्वलन कार्यक्रमाने मंदिर परिसर अधिकच उजळून निघाला. हजारो दिव्यांच्या प्रकाशात मंदिर परिसर सोन्याचा झगमगता दिसत होता. या वेळी पारंपरिक वेशभूषेत आलेल्या भाविकांनी देवीसमोर आरती, भजन, आणि दीपदान करून दिवाळीचा उत्सव भक्तिभावाने साजरा केला.



शहरातील प्रमुख रस्ते आणि बाजारपेठांमध्येही दिवाळीचा उत्साह ओसंडून वाहत होता. पोलिस आणि मंदिर प्रशासनाने सुरक्षेची योग्य व्यवस्था केली होती. मंदिरात प्रवेशासाठी विशेष नियोजन, दर्शनासाठी स्वतंत्र रांगा, तसेच भाविकांच्या सोयीसाठी पाणी व आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. दिवाळीच्या या मंगलदिनी करवीरनिवासिनी अंबाबाई देवीच्या दर्शनाने संपूर्ण कोल्हापूर भक्तिभाव, प्रकाश आणि आनंदाने उजळून निघाले.

## एकनाथ शिंदेंच्या 'लाडकी बहीण योजने'त बहिणींना विशेष सन्मान; दिवाळी व भाऊबीजचे हार्दिक शुभेच्छा"

ठाणे – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिवाळीच्या सणानिमित्त ठाणे आणि राज्यातील सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. शिंदे म्हणाले, "दिवाळीचा पर्व सुरू झाला आहे. पाडवा हा आनंदाचे, सुखाचे आणि समृद्धीचे दिवस घेऊन येवो."

भाऊबीज – बहिणींसाठी विशेष उपक्रम

भाऊबीजच्या दिवशी उपमुख्यमंत्री शिंदेंनी बहिणींना विशेष भेटवस्तू आणि सन्मान देण्याचे जाहीर केले. यानुसार, 'लाडकी बहीण योजना' अंतर्गत बहिणींना आर्थिक व सामाजिक सहाय्य तसेच विशेष सवलती उपलब्ध होतील. शिंदे यांनी स्पष्ट केले की ही योजना केवळ सणापुरती मर्यादित नसून कायमस्वरूपी सुरू राहणार आहे.

योजना अंतर्गत बहिणींना शैक्षणिक, आरोग्य व सामाजिक विकासाच्या क्षेत्रात प्रोत्साहन दिले जाईल. तसेच स्थानिक स्वयंसेवी संस्था आणि शासकीय योजनेच्या



माध्यमातून बहिणींचा सन्मान आणि संरक्षण सुनिश्चित करण्याचे प्रयत्न केले जातील.

शिंदे म्हणाले, "भाऊबीज हा फक्त भाव-बहिणीचा सण नाही, तर समाजातील नातेसंबंधांना बळकटी देणारा उत्सव आहे. यामध्ये बहिणींना सन्मान देणे हा आमच्या सामाजिक जबाबदारीचा भाग आहे."

राजकीय पार्श्वभूमी

शिंदेंनी रोहित पवार यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना सांगितले की, "अशा प्रकारचे वक्तव्य दुर्दैवी आहे. RSS ही संघटना कडवट देशभक्त आणि राष्ट्रभक्त संघटना आहे. संकटाच्या वेळी ही संघटना धावून जाते आणि प्रखर राष्ट्रभक्तीवर काम करते. अशा RSS वर बंदी घालावी असे म्हणणे चुकीचे आहे."

उपमुख्यमंत्री यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीच्या निर्णयाचेही समर्थन केले आणि म्हटले की, "लोकशाहीमध्ये प्रत्येक पक्षाला आपापले निर्णय घेण्याचे अधिकार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीचाच भगवा डौलाने फडकेल."

शिंदेंच्या संदेशातून सणाची पारंपरिक महत्त्वे तसेच बहिणींसाठी विशेष योजना राबवण्याची सामाजिक जबाबदारी स्पष्ट होते. भाऊबीजच्या दिवशी 'लाडकी बहीण योजना' हायलाइट करणे आणि राजकीय मुद्द्यावर प्रतिक्रिया देणे – दोन्ही शिंदेंच्या रणनीतीचा भाग दिसतो. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री – लाडकी बहीण योजना आणि भाऊबीज विशेष उपक्रम.

## खासदार संजय राऊत यांचा सरकारवर तीव्र शब्दात हल्ला — "5 कोटींचा निधी म्हणजे लाच"

मुंबई - शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी आज पत्रकार परिषद घेत देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारवर जोरदार टीका केली.

राऊत म्हणाले, "या सरकारकडे सत्ता आल्यापासून निधी वाटपाचा पायंडा पडला आहे. आपल्या लोकांना निधी देऊन विरोधकांना वंचित ठेवणे, हा लोकशाहीविरोधी कारभार आहे. हे बेकायदेशीर कृत्य असून राष्ट्रपतींनी याची दखल घ्यावी."

ते पुढे म्हणाले, "राज्यपाल नाहीत, आणि असले तरी ते भाजपचे हस्तक असतात. राज्यातील सर्व आमदार निवडून आलेले आहेत, मग काहींनाच निधी का दिला जातो? जनतेचा पैसा हा कुणाच्या घरचा नाही. ५ कोटी रुपयांचा निधी ही एकप्रकारे लाच आहे. यामागे



किती विकास आणि किती ठेकेदारांच्या कमाईचा खेळ आहे, हे राज्यातील जनतेने पाहिले पाहिजे."

राऊत यांनी आरोप केला की, "या सरकारमधील लोक पैशाच्या जोरावर योजना आणतात. हे ५ कोटी ठेकेदारांमार्फत परत फिरवले जातील आणि नंतर मतदार विकत घेण्यासाठी वापरले जातील. आम्हाला या भ्रष्ट कारभाराविरोधात आवाज उठवावा लागेल."

एकनाथ शिंदे यांच्यावर थेट टीका

राऊत म्हणाले, "यात दोन गोष्टी आहेत — श्रीकांत शिंदे यांनी ८०० कोटींच्या ॲम्ब्युलन्स टेंडर काढले होते. त्यांनी वडिलांसाठी एकही ॲम्ब्युलन्स पाठवली नाही. राष्ट्रपती, पंतप्रधान यांच्यासाठी ॲम्ब्युलन्स ठेवली जाते, पण मुख्यमंत्री कोण आहेत? फडणवीस यांच्या ताफ्यात दोन ॲम्ब्युलन्स आहेत म्हणून माझ्या ताफ्यात चार पाहिजेत, अशी हास्यास्पद स्पर्धा राज्यात सुरू झाली आहे."

फडणवीसांच्या सोलापूर भेटीवर प्रतिक्रिया

राऊत यांनी फडणवीस यांच्या सोलापूर दौऱ्याबद्दल म्हणाले, "यावर अजित पवार आणि सुभाष देशमुख यांचीही प्रतिक्रिया घेतली पाहिजे." पत्रकार परिषदेत राऊत यांनी सत्ताधाऱ्यांवर तीव्र शब्दांत हल्ला चढवताना म्हटले की, "राज्याच्या विकासाचा पैसा हा काही निवडकांच्या खिशात जात आहे. हा भ्रष्टाचार आणि सत्तेचा गैरवापर आम्ही गप्प बसून पाहणार नाही."


उज्ज्वल दीपावलीच्या प्रकाशासारखे तुमचे जीवन सुख-समृद्धीने भरून जावो!
पाडवा आणि भाऊबीजच्या मंगलमय दिवसांनी कुटुंबात आनंदाची उजळणी होवो!
सुख, समृद्धी आणि आनंदाचा प्रकाश सर्वांसमोर प्रकट होवो!
दिपावली पाडवा
आणि भाऊबीजच्या
समस्त जनतेला
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छूक:-
मा. श्री.प्रदीप देशमुख
तालुका अध्यक्ष,मेहकर तालुका काँग्रेस


। अंगण सजले फुल आणि रांगोळ्यांनी,
स्वागत करण्यास दिवाळीसणाची ।
।। तोरणे आकाश कंदिल लागले दारी, आली दिवाळी आपुल्या घरी ।।
दिपावली पाडवा
आणि भाऊबीजच्या
समस्त जनतेला
हार्दिक शुभेच्छा
-:शुभेच्छूक:-
मा.श्री.विनायकराव टाले
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस
जि.प.सर्कल प्रमुख डोणगाव
मा.श्री.सुरेश फिसके
सामाजिक कार्यकर्ते


या प्रकाशोत्सवाच्या पावन पर्वावर
आपल्या जीवनात सुख, समृद्धी, आरोग्य आणि आनंदाची
सोनसाखळी उजळो!
दिपावली व
भाऊबीज
निमीत्त आपणास व आपल्या
परिवारास हार्दिक
शुभेच्छा..
श्री.गजानन हार्डवेअर & मशिनरीज
खात्रीशीर पंप व सिलेक्शन मिळेल!
पाईपलाईनचा संपूर्ण सर्वे करून योग्य सल्ला दिला जाईल.
विश्वासार्ह तंत्रज्ञान • खात्रीशीर गुणवत्ता • उत्कृष्ट सेवा
श्री. राजेंद्र आखाडे (सिव्हिल इंजिनियर)
MO. 9890488478 | 9922976046
Falcon
या दिवाळीत नवीन उर्जेसोबत आणा विश्वासाचा प्रवाह –श्री गजानन हार्डवेअर अँड मशिनरीज सोबत!


या प्रकाशोत्सवाच्या पावन पर्वावर
आपल्या जीवनात सुख, समृद्धी, आरोग्य आणि आनंदाची
सोनसाखळी उजळो!
दिपावली व
भाऊबीज
निमीत्त आपणास व आपल्या
परिवारास हार्दिक
शुभेच्छा..
भाऊबीजच्या या पवित्र नात्याच्या दिवसानिमित्त
प्रेम, आपुलकी आणि एकतेचा दीप सदैव तेजोमय राहो!
::शुभेच्छुक- महेबूब शेख
दैनिक आपला विदर्भ उमरखेड तालुका प्रतिनिधी


प्रकाशाच्या या पावन सणाने आपल्या जीवनात आनंद, समृद्धी आणि
समाधानाचे सुवर्णकिरण पसरवोत! आपल्या कुटुंबाच्या
आयुष्यात सुख, शांती आणि आरोग्य नांदो — हीच मंगल कामना.
दिपावली व भाऊबीज
निमीत्त आपणास व आपल्या
परिवारास हार्दिक
शुभेच्छा..
मा.श्री.रोहित सरलाबाई
विष्णूदास वर्मा
जिल्हाध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा पुसद


या प्रकाशोत्सवाच्या पावन पर्वावर
आपल्या जीवनात सुख, समृद्धी, आरोग्य आणि आनंदाची
सोनसाखळी उजळो!
दिपावली व
भाऊबीज
निमीत्त आपणास व आपल्या
परिवारास हार्दिक
शुभेच्छा..
सर्वांना आनंद, समृद्धी आणि उज्ज्वल
भविष्यासाठी शुभेच्छा
आर. के. अर्थमुव्हर्स, ढाणकी
"विश्वास आणि गुणवत्ता आमची ओळख"
आमच्याकडे जेसीबी भाड्याने मिळेल
वेळेवर सेवा
अनुभवी ऑपरेटर
परवडणारे दर
संपर्क: 9527571787 ऑपरेटर: 8999517018
गोविंद गंगाराम सल्लेवाड- आपला विश्वासू सेवा सहयोगी
"आपल्या घरात सुख, समृद्धी व आनंदाचा प्रकाश सदैव झळकत राहो!"